1 DEC 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निकालाची 'परीक्षा' होणार सोपी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



परीक्षेच्या नियोजनातच योग्य काळजी घेतली आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा निचरा केल्यास परीक्षेनंतरच्या निकालाची प्रक्रिया अधिक सोपी होते. याच संकल्पनेवर शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्रशासन आणि विद्यार्थी यांच्यातील परीक्षापूर्व संवाद तंत्रज्ञानाच्या मदतीने दृढ केला आहे. परीक्षा सुधार आराखडा उपक्रमांतर्गत परीक्षा काळातील त्रुटी दूर केल्या जात आहेत. परिणामी विद्यापीठाच्या वेळेत निकाल लावण्याची 'परीक्षा' अधिक सोपी होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटवरील परीक्षा क्रमांकापासून ते परीक्षेला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना मेसेज पाठवण्यापर्यंत आणि सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक संकेतस्थळावर अपलोड करण्यापासून विषयांची यादी विद्यार्थ्यांना देण्यापर्यंतचा आराखडा कार्यान्वित केला आहे.

परीक्षा विभागाने यंदाच्या हिवाळी सत्रापासून विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील गैरहजेरीची ऑनलाइन दखल घेतली आहे. यावर्षीच्या पहिल्या सत्रातील परीक्षेला ३७ हजार विद्यार्थी गैरहजर असल्याची नोंद परीक्षा विभागाकडे झाली. या गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना मेसेजद्वारे ही माहिती देण्यात आली. यामुळे परीक्षेला हजर न राहणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत त्यांच्या पालकांना सावध करण्यात आले. तसेच परीक्षेला हजर असलेल्या काही विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेवर चुकीचा परीक्षा क्रमांक घातल्याचे निदर्शनास आल्यानंतर तातडीने विद्यार्थ्यांना याबाबत मेसेज देण्यात आले. त्यांच्याकडून चुकीची दुरूस्ती करण्याबाबतची प्रक्रिया निकालापूर्वीच राबवली जाणार आहे. त्यामुळे अंतिम ई मार्कशीट तयार करताना वेळेची बचत होणार आहे. यंदा प्रायोगिक तत्त्वावर फार्मसीच्या ४५६ विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपी पीडीएफ स्वरूपात मेलवर पाठवण्यात येणार आहेत. यामधून १५ लाखांची बचत होणार असून पुनर्मूल्यांकनामध्ये निकालानंतर लागणारा वेळ कमी होऊ शकेल.

**परीक्षा सुधार आराखडा कार्यान्वित**

प्रश्नपत्रिकांच्या वितरणासाठी एसआरपीडी अर्थात सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी या इ मोड प्रणालीचा अवलंब केला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका वितरित करण्यात आल्या होत्या. आता त्याची व्याप्ती वाढवण्यात आली असून यंदा नव्याने काही अभ्यासक्रमांचा समावेश या प्रणालीत करण्यात आला आहे. प्रश्नपत्रिकांचे योग्य वितरण हा देखील निकाल योग्य वेळेत लागण्यासाठी स्तुत्य आहे. कम्प्युटर सायन्स आणि आयटी शाखांमध्यील २४ विषयांची परीक्षा ऑनलाइन घेण्याचे काम सुरू झाल्याने या परीक्षेचा वेळही वाचणार आहे. जेणेकरून निकाल लागण्याचा कालावधी अधिक कमी होईल.

पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत बी. फार्मसी व एम. फार्मसी या अभ्यासक्रमाच्या मूल्यांकित उत्तरप त्रिकांचे स्कॅनिंग विद्यार्थ्यांना मागणीप्रमाणे ऑनलाइन स्वरूपात देण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सध्या सुरू आहे. यामुळे छपाई व पोस्टेजचा खर्च वाचण्यासोबत वेळेचीही बचत होईल. ऑनलाइन प्रकियेमुळे निकालास विलंब होणार नाही.

> परीक्षाकाळात विद्यार्थ्यांकडून नजरचुकीने काही चुका होता. उत्तरपत्रिकांतही अनावधानाने चुकीचा क्रमांक लिहिला जातो. या बाबी परीक्षाकाळात किंवा उत्तरपत्रिका तपासण्यापूर्वीच लक्षात आल्या तर त्या तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर होऊ शकतात. यासाठी ही प्रणाली अतिशय उपयुक्त ठरत आहे. या परीक्षा सुधार आराखड्यामुळे वेळेची बचत होऊन निकाल वेळेत लागणार आहे.
>
> **- महेश काकडे, परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 DEC 2017
तरुण भारत

# स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसारच

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ यात सुधारणा करीत शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात याव्या, असा अध्यादेश राज्यपाल विद्यासागर राव यांनी रविवारी जारी केला आहे. त्यामुळे यंदा राज्यभरातील विद्यापीठांच्या 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूका' मेरीटनुसारच होणार आहेत. ही निवडणूक प्रक्रिया २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी पूर्ण करण्याच्या सुचना आदेशात असल्याने शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाने निवडणूकीच्या तयारीला प्रारंभ केला आहे.

महाविद्यालयीन निवडणुकीमधील राजकीय हस्तक्षेप, त्यातून होणारे गैरप्रकार आदी कारणास्तव १९९४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार गुणवत्तेवर 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूका' घेतल्या जात होत्या. सत्तेत आल्यानंतर भाजप सरकारने 'लिंगडोह समिती'च्या शिफारशीनुसार महाविद्यालयाची निवडणूक घेण्याचा निर्णय जाहीर केला. या निवडणुकीच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षाला योग्य नेतृत्व गुण असलेला उमेदवार मिळणार असल्याने, सर्वच पक्षांनी या निर्णयाला पाठिंबादेखील दिला. विद्यार्थी व विद्यार्थी संघटना या निवडणूकीच्या 'परिनियमां'कडे लक्ष लागून होते. मात्र रविवारी राज्यपाल विद्यासागर राव यांनी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूका' मेरीटनुसार घेण्याचे आदेश दिले आहेत. या निवडणूका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदयातील नवीन कलम ९९ (क) नुसार घेण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ची अमंलबजावणी १ मार्चपासून सर्वच विद्यापीठांनी केली आहे. तरीही यंदाच्या 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकां'चे परिनियम विद्यापीठांना प्राप्त न झाल्याने या निवडणूका लांबणीवर पडल्या होत्या. त्यामुळे २०१६ च्या कायद्यात बदल करीत 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूका' सुधारीत कलम ९९ नुसार होणार आहेत. स्टुडंट कौन्सिलची निवडणूक लढवणारा विद्यार्थी कोणत्याही राजकीय पक्षाचा नसून मेरीटनुसार निवडला जाणार आहे. 'स्टुडंट कौन्सिल निवडणूका' झाल्यानंतर तयार होणाऱ्या स्टुडंट कौन्सिलच्या अध्यक्षपदी कुलगुरू तर सभापतीपदी विद्यार्थी विकास संचालक असणार आहेत. तसेच क्रीडा व शारीरिक संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संचालक आणि प्रत्येक महाविद्यालय, विद्यापीठ अधिविभागातील पदवी परीक्षेत पहिला आलेला कुलगुरू नामनिर्देशित एक गुणवंत विद्यार्थ्यांचा सदस्यपदी समावेश असणार आहे. तर महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिल निवडणुकीनंतर महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिलच्या सभापतीपदी प्राचार्य, राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रभारी अध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि प्रत्येक वर्गातील एक गुणवंत विद्यार्थी, प्राचार्य, क्रिडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभागातील प्रत्येकी एक नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यपदी असणार आहे. यापैकी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विद्यार्थीनी प्रतिनिधी अशा पध्दतीने प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात येणार आहे. स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीतून विद्यार्थी आपला सभापती व सचिव निवडून देणार आहेत. हे सदस्य महाविद्यालय व विद्यापीठ तापळीवर विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रतिनिधीत्व करतील.



- २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यपालांकडून अद्यादेशाद्वारे नियमावली जाहीर
- २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी स्टुडंट कौन्सिलची निवडणूक प्रक्रिया पार पडणार
- विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागातर्फे निवडणुकीची तयारी सुरु

## विद्यापीठाकडून निवडणुकीच्या तयारीला प्रारंभ

विद्यार्थी विकास विभागातर्फे स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीची तयारी सुरू झाली आहे. कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्याशी चर्चा करून निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात येईल. निवडणूकीची तयारी करण्यासाठी आणखी अडीच महिने विद्यापीठ प्रशासनाकडे आहेत. त्यामुळे योग्य नियोजन करून या निवडणूका सुरळीत पार पाडण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. निवडणूकीसंदर्भातील अद्यादेश शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे. - **डॉ. आर. व्ही. गुरव (विद्यार्थी विकास संचालक)**

1 DEC 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**नवीन विद्यापीठ कायद्यामुळे गरज : रचनात्मक, विधायक कामांसाठी आवश्यक**

# अधिकार मंडळ नूतन सदस्यांना प्रशिक्षणाची गरज

**संतोष मिठारी ।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जुन्या कायद्याच्या तुलनेत अनेक बदलांसह नवीन विद्यापीठ कायदा लागू झाला आहे. या कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाची अधिसभा व अन्य अधिकार मंडळांसाठी निवडणुका पार पडल्या आहेत. त्यामध्ये अनेक नव्या चेहऱ्यांना या मंडळांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे. ते लक्षात घेता या नवनिर्वाचित सदस्यांना अधिकार मंडळांच्या कामाची पद्धती, त्यांचे अधिकार, आदींची माहिती देणारे प्रशिक्षण, मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदी घटकांचा विचार करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ हा नवीन कायदा शासनाने मार्च २०१७ पासून लागू केला. यापूर्वीच्या कायद्यामध्ये आणि या नवीन कायद्यामध्ये फरक आहे. तो समजून घेण्याची प्रक्रिया विद्यापीठातील घटकांकडून सुरु असतानाच या नव्या कायद्यानुसार अधिसभा, अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुका पार पडल्या. दि. ३० नोव्हेंबरपूर्वी निवडणुका घेण्याचे शासनाने सूचित केल्याने विद्यापीठासह या निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सर्व घटकांची धावपळ झाली. त्यात अनेकांना या अधिकार मंडळांचे कामकाज, त्याची पद्धती, अधिकार, कार्यकक्षा आदींची माहिती सखोलपणे घेता आली नाही. निवडणुकीच्या माध्यमातून अनेक नवे चेहरे पहिल्यांदाच विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर काम करणार आहेत. त्यांच्या माध्यमातून विद्यापीठातील कामकाज हे संस्थात्मक, रचनात्मक आणि विधायक पद्धतीने होण्यासाठी त्यांना प्रत्येक अधिकार मंडळांच्या कार्यकक्षा, अधिकार यांची माहिती होणे महत्त्वाचे ठरणारे आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ प्रशासनाने या नवनिर्वाचित आणि नामनिर्देशित होणाऱ्या सर्व सदस्यांचे मार्गदर्शन शिबिर अथवा प्रशिक्षण घेणे आवश्यक असल्याचे मत नूतन सदस्य आणि विद्यापीठ क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

## प्रशासनाला काय करता येईल

नवीन विद्यापीठ कायदा तयार करण्याच्या प्रक्रियेतील तज्ज्ञ, गेल्या काही वर्षांपासून विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर काम केलेल्या सदस्यांचे मार्गदर्शन आयोजित करता येईल. त्यासह विविध अधिकार मंडळांची माहिती ऑनलाईन पद्धतीने ई-मेलद्वारे सदस्यांना देता येईल.



“विविध अधिकार मंडळांच्या सदस्यांची कर्तव्ये, जबाबदारी आणि ते काय करु शकतात याची माहिती नूतन सदस्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने अभ्यासवर्ग किंवा कार्यशाळा घ्यावी. त्याचा विद्यापीठासह आम्हा नूतन सदस्यांचा चांगला उपयोग होईल.

\- पंकज मेहता, नूतन सदस्य, नोंदणीकृत पदवीधर गट

“विधायक, गुणात्मक, रचनात्मक पद्धतीने विद्यापीठाची वाटचाल होण्यासाठी विविध अधिकार मंडळांवरील सर्व सदस्यांना नवीन विद्यापीठ कायद्याची आणि अधिकार मंडळांच्या कामाची एकत्रितपणे माहिती देणे आवश्यक आहे.

\- जे. एफ. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

“नूतन सदस्यांना या कायद्याबाबतची पूर्ण माहिती नाही. ते लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने नवीन कायद्याची माहिती देणारे शिबिर, कार्यशाळा या नूतन सदस्यांसाठी घ्यावी. याबाबतची मागणी विद्यापीठ विकास मंचदेखील विद्यापीठ प्रशासनाकडे करणार आहे.

\- प्रा. **शंकरराव कुलकर्णी**, कोल्हापूर विभागप्रमुख, विद्यापीठ विकास मंच.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 DEC 2017
सकाळ

# विद्यापीठाच्या बास्केटबॉल, व्हॉलीबॉल संघास कास्यपदक



कोल्हापूर : दापोली कृषी विद्यापीठातर्फे आयोजित क्रीडा महोत्सवात व्हॉलीबॉलमध्ये कास्यपदक पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा मुलींचा व्हॉलीबॉल संघ.

कोल्हापूर, ता. ३० : दापोली कृषी विद्यापीठार्फे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या बास्केटबॉल व व्हॉलीबॉल संघाने कास्यपदक पटकाविले. खेळाडूंनी थाळीफेक, लांब उडीत दोन सुवर्ण, लांब उडीत रौप्य, धावणे प्रकारात दोन रौप्य व एक कास्य, गोळा फेकमध्येही कास्यपदक मिळविले.

बास्केटबॉलमध्ये कास्यपदक पटकाविणाऱ्या विद्यापीठाच्या मुलींच्या संघात सुरभी बनसोडे, ऋतुजा पवार, स्वप्नाली चव्हाण, तेजस्विनी केकरे, उमा गोखले, वैष्णवी नवणे, प्रतीक्षा गुरुळे, आस्था भट, अश्विनी शिंदे, आशिया मुलाणी, गिरीजा पाटील, अपूर्वा बरगे यांचा समावेश होता. त्यांना प्रशिक्षक प्रा. डॉ. एस. जे. फराकटे यांचे मार्गदर्शन मिळाले.

व्हॉलीबॉलमध्ये कास्यपदक पटकाविणाऱ्या विद्यापीठाच्या संघात नेहा शिंदे, ज्ञानदा इनामदार, आयेशा बारूदवाले, कल्याणी भोळे, स्नेहल कणसे, ऋतुजा कदम, पूजा पवार, ऐश्वर्या ऐतवडे, विद्या चव्हाण, आरती आरडे, श्रद्धा जाधव, रितीका पारळे यांचा सहभाग होता. संघास प्रशिक्षक प्रा. रमेश पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

लांब उडीमध्ये चैत्राली कालिदास गुजरने सुवर्ण, ४ बाय ४०० मीटर धावणेमध्ये रामदास पाटील, कृष्णात पाटील, सचिन धोतरे, ओंकार गावडे यांनी रौप्य, ४ बाय ४०० मीटर धावणेमध्ये रेश्मा तेजम, सुचित्रा गावडे, प्रतीक्षा पाटील, शीतल पाटील यांनी कास्यपदक पटकाविले. लांब उडीमध्ये प्रगती रामचंद्र संकपाळने रौप्य, गोळाफेक नंदिनी दत्तात्रय पांढरे कास्य, पाच हजार मीटर धावणे आदिनाथ रामचंद्र भोसले रौप्य व थाळीफेकमध्ये किर्तीकुमार जयप्रकाश बेनकेने सुवर्णपदक मिळविले. या खेळाडूंना विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले.

1 DEC 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खो - खो स्पर्धेत नांदेड, मुंबईची बाजी

## आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा ; उंच उडीत शीतल पिजारी प्रथम, आज समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**दापोली** : दापोली येथे सुरु असलेल्या आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये तिसऱ्या दिवशी खो-खो क्रीडा प्रकारातील पुरुष गटात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महिलांमध्ये मुंबई विद्यापीठाने बाजी मारली. क्रीडा स्पर्धांची आज (शुक्रवारी) सांगता होणार आहे.

निकाल अनुक्रमे असा:

खो-खो (पुरुष) : स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. खो-खो (महिला) : मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.

मैदानी स्पर्धा : ८०० मीटर धावणे (पुरुष) नानू दीपू देवराजन मनिअम्मा(मुंबई विद्यापीठ), रामदास पाटील (शिवाजी विद्यापीठ) चैतन्य होलगरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)

४ बाय १०० मीटर्स टप्पा (पुरुष) : मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. ४ बाय १०० मीटर्स टप्पा (महिला): मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

८०० मी. धावणे (महिला): सायली वाघमारे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ), ऐश्वर्या मिश्रा (मुंबई विद्यापीठ), दुर्गा देवरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ).

५००० मीटर धावणे (महिला): संजीवनी जाधव (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), प्रियांका चव्हारकर (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), कोल्हापूरच्या प्रतीक्षा पाटील (शिवाजी विद्यापीठ).

भालाफेक (पुरुष): अनिल घुंगसे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), अक्षय घोंगे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), सय्यद अफताब खुबुद्दीनने (सोलापूर विद्यापीठ).

बास्केटबॉल (पुरुष) : पहिल्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली.

बास्केटबॉल (महिला) : पहिल्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने बाजी मारली.

व्हॉलीबॉल (महिला) : पहिला उपांत्य सामना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला तर दुसरा उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जिंकला. व्हॉलीबॉल (पुरुष) : पहिला उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसरा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला.

कबड्डी (पुरुष) या उपांत्य सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व मुंबई विद्यापीठाने बाजी मारली.

- ◆ गोळाफेक (महिला) : ज्योती बनसोडे (सोलापूर विद्यापीठ) , किरण नवगिरे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) , नंदिनी पांढरे (शिवाजी विद्यापीठ).
- ◆ उंचउडी (महिला) : शीतल पिजारीने (शिवाजी विद्यापीठ), स्नेहल हार्डे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), सिद्धी ढगे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2017
लोकसत्ता

# मुंबई विद्यापीठाला महिलांचे जेतेपद

प्रतिनिधी, दापोली

**गतविजेत्या कोल्हापूरला** नमवून अंतिम फेरीत धडकलेल्या मुंबईची झुंज औरंगाबाद विद्यापीठाने मोठ्या दिमाखात रोखली आणि २१ वर्षांत पहिल्यांदाच आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेच्या विजेतेपदाला गवसणी घातली. औरंगाबादने ३८-१८ अशा फरकाने बाजी मारली. सलग दोन वर्षे त्यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. मुलींच्या गटात मुंबई विद्यापीठाने ३६-१४ अशा फरकाने पुणे विद्यापीठाला नमवले.

मयुर शिवतरकर, सुत्तील दिबिले, भूषण कुंभार, गणेश जाधव हे औरंगाबाद विद्यापीठाच्या विजयाचे शिल्पकार ठरले. मुंबईतर्फे कुलदीप माईणकर, आकाश गोजारे, संकेत सावंत यांनी लक्षवेधी कामगिरी केली. महिला कबड्डीत तेजस्विनी पोटे, पौर्णिमा जेधे आणि सुधा पवार यांच्या खेळाने मुंबई विद्यापीठाने जेतेपदावर विजयी मोहोर लावली. उपविजेत्या पुणे संघात सत्यवा हळदकेरी, प्रतीक्षा, कर्हेकर, अश्विनी गायकवाड यांचा खेळ चमकदार ठरला.

खो-खो स्पर्धेत पुरुष गटात नांदेडने दोन गुण व अडीच मिनिटांनी मुंबईवर विजय मिळवत जेतेपद कायम राखले. त्यांच्या सुरेश सावंत यांना सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान मिळाला. त्यांच्यापाठोपाठ मुंबई आणि कोल्हापूर विद्यापीठाने अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले. महिला गटात मुंबई, पुणे आणि अमरावती पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरले. मुंबईने १ डाव व सात गुणांनी विजय मिळवला. मुंबईची ऐश्वर्या सावंत सर्वोकृष्ट खेळाडू ठरली.

1 DEC 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खो-खो पुरुष गटात 'मराठवाडा' विजेता

## आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा; महिला गटात मुंबई विद्यापीठ प्रथम तर पुरुष गटात द्वितीय

**कोल्हापूर/दापोली : प्रतिनिधी**

येथे सुरू असलेल्या आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये खो-खो पुरुष गटात अंतिम सामन्यात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबईने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेने तृतीय क्रमांक पटकावला. खो-खो महिला गटात क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने द्वितीय तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने तृतीय क्रमांक पटकावला.

८०० मी. धावणे (पुरुष) यामधे मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या नानू दिपू देवराजन मनिअम्मा याने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या रामदास पाटील याने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या चैतन्य होलगरे याने तृतीय क्रमांक पटकावला. ४ बाय १०० मीटर्स टप्पा(पुरुष) शर्यतीमध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळविला. ८०० मी. धावणे (महिला) यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या सायली वाघमारे हिने प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या ऐश्वर्या कैलास आशा मिश्रा हिने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेच्या दुर्गा देवरे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

४ बाय १०० मीटर्स टप्पा (महिला) शर्यतीमध्ये



संग्रहित छायाचित्र

मुंबई विद्यापीठाने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने द्वितीय तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावने तृतीय क्रमांक पटकावला. ५००० मी. धावणे (महिला) यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संजीवनी जाधव हिने प्रथम, याच विद्यापीठाच्या प्रियांका चव्हारकर हिने द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या प्रतीक्षा पाटील हिने तृतीय क्रमांक पटकावला. भालाफेक (पुरुष) मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या अनिल रोहिदास घुंगसे यांने प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अक्षय घोंगे याने द्वितीय तर सोलापूर विद्यापीठाच्या सय्यद अफताब खुबुद्दीनने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

गोळाफेक (महिला) या प्रकारात सोलापूर विद्यापीठाची ज्योती बनसोडे प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची किरण नवगिरे द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची नंदिनी पांढरे तिसरी आली.

उंचउडी (महिला) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या शीतल संभाजी पिंजारी प्रथम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्नेहल चंद्रकांत हार्डे द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिद्धी ढगेने तृतीय प्राप्त केले.

बास्केटबॉल (पुरुष) मध्ये झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली. बास्केटबॉल (महिला) मध्ये झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने बाजी मारली. व्हॉलीबॉल (महिला) मध्ये झालेला पहिला उपांत्य सामना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला तर दुसरा उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जिंकला. व्हॉलीबॉल (पुरुष) मध्ये झालेला पहिला उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसरा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला.

कबड्डी (पुरुष) या उपांत्य सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने बाजी मारली. कबड्डी (महिला) या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने तर दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली.